



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784









वर्ष ३ रे   अंक : १८० वा सोमवार   दि ०१ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८   किंमत ३ रुपये


# पर्यायांची चाचपणी; मराठा आरक्षणाबाबत कायद्याच्या चौकटीत निर्णय घेण्याचे मुख्यमंत्र्यांकडून स्पष्ट

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठा आरक्षणासाठी तीन दिवसांपासून आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारने पर्यायांची चाचपणी सुरू केली आहे. मंत्रिमंडळ उपसमितीने रविवारी दोन वेळा बैठका घेऊन विविध मुद्द्यांवर मंथन केले. मात्र, त्यातून कोणताही तोडगा निघू शकला नाही; परंतु, ङ्गतोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असून, कायदा, राज्यघटनेच्या चौकटीतच निर्णय घेण्यात येईल,फ असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी स्पष्ट केले. आझाद मैदान आणि परिसरात रविवारी सलग तिसऱ्या दिवशी आंदोलकांनी शक्तिप्रदर्शन करून आरक्षणाची मागणी जोरकसपणे मांडली. या पार्श्वभूमीवर शासकीय पातळीवर बैठकांचे सत्र सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मुद्द्यावर सरकारची भूमिका मांडली. या संदर्भात कायद्याच्या चौकटीतच निर्णय घ्यावा लागणार आहे. न्यायालयाच्या आधीच्या निर्णयांचाही विचार करावा लागेल.कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन असेच निर्णय घ्या, असे कोणी म्हणत असेल आणि सरकारने त्यांना खूश करण्यासाठी असा निर्णय घेतला तर तो एक दिवसही टिकणार नाही. त्यानंतर मराठा समाजाची फसवणूक झाल्याची भावना तयार होईल. त्यामुळे आम्ही चर्चा करीत आहोत. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीत विचार-विनिमय सुरू आहे. कायदेशीर सल्लागारांचे मत घेत आहेत. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू. लोकशाहीत चर्चेतून तोडगा निघतो. आडमुठ्या भूमिकेने तोडगा निघत नाही,फअसे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ङ्गमाजी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आपण तयार केली. त्या समितीमुळेच बऱ्याच नोंदी सापडल्या. अनेकांना प्रमाणपत्रेही मिळाली. शिंदे समितीनेच जरांगे यांना भेटून या बदलासाठी वेळ लागणार असल्याचे सांगितले. पण, आताच द्या, असे त्यांचे म्हणणे आहे. शेवटी चर्चेतून मार्ग



काढता येतो. मला कायद्यानुसारच निर्णय घ्यावे लागतात. मी घटनेच्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही,फअसेही ते म्हणाले. ङ्गमराठा आरक्षणाचा हा प्रश्न राजकीय करण्याचा काहींचा प्रयत्न आहे. सामाजिक प्रश्नात राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नये,फ असे फडणवीस म्हणाले. शिव्या खाणे, लोकांचा उपहास सहन करणे या गोष्टींची मला सवय आहे. त्याचा माझ्यावर काही परिणाम होत नाही. लोक तुम्हाला तुमच्या कर्तृत्वाने लक्षात ठेवतात, तुम्हाला कोणी शिव्या दिल्या यामुळे लक्षात ठेवत नाहीत आणि शिव्या देणाऱ्यांनाही लक्षात ठेवत नाहीत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. सरकारकडे ५८ लाख कुणबी नोंदी आहेत. याच आधारावर मराठा आणि कुणबी एक असल्याचा शासन निर्णय काढावा, असा नवा पर्याय मनोज जरांगे यांनी रविवारी संध्याकाळी सरकारला दिला. सोमवारपासून जलत्यागाचा इशाराही जरांगे यांनी दिला. नेत्यांना आंदोलनस्थळी येण्यापासून रोखू नका, अशी सूचनाही त्यांनी केली

# भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांचा बुलढाणा नगर परिषद प्रभाग रचनेवर आक्षेप

**जनसंचलन/ बुलढाणा**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रेलचेल सुरू झालेली असून बुलढाणा नगरपरिषदेने तयार केलेल्या प्रभाग रचनेवर भाजप जिल्हाध्यक्ष मा.आमदार विजयराज शिंदे यांनी आज दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी शेवटच्या दिवशी मुख्याधिकारी नगरपरिषद बुलढाणा यांच्याकडे लेखी आक्षेप नोंदविला आहे. यामध्ये त्यांनी सात मुद्दे नमूद केले असून तीन मुद्द्याद्वारे मागणी सादर केली आहे. त्यांनी दिलेल्या आक्षेप अर्जामध्ये नमूद केले आहे की, महाराष्ट्र शासनाने प्रभाग रचना करताना दिलेल्या संदर्भिय मार्गदर्शक सूचना यानुसार प्रभाग रचना करणे अपेक्षित होते. परंतु बुलडाणा नगर परिषदेतील प्रत्यक्ष प्रभाग रचना वरील मार्गदर्शक तत्वांचे पालन करून करण्यात आलेली नाही.

१. प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी, उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा, प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहे. परंतु बुलडाणा नगर परिषदेने प्रभाग क्रमांक १ ची रचना करताना उत्तरेकडून न करता वायव्य या उपदिशेपासून केली आहे. ( सोबत दिशा व उपदिशा प्रभाग रचनेचा नकाशा जोडला आहे. )

२. प्रभाग रचना करताना नैसर्गिक सीमांचे विचार (नदी, रस्ता, रेल्वे मार्ग, मोठे रस्ते इ.) करण्यात आलेले नाहीत. प्रभाग क्रमांक १ , १०,११ आणि मधून राष्ट्रीय महामार्गामुळे जात असल्याने त्या प्रभागाचे तुकडे होत असून नैसर्गिक सीमांचा विचार करण्यात आलेला नाही

३. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, सीमेचे वर्णन करताना रस्ते, रेल्वे, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे. असे निर्देश आहे.परंतु याची दक्षता घेण्यात आलेली नाही . प्रभागाची व्याप्ती स्पष्ट करतांना सीमा रेषांचे स्पष्ट दिशा निर्देश समजत नाही. उदा. शेत सर्वे नंबरचा जास्त प्रमाणात उल्लेख केलेला असल्याने आणि नागरिकांना शेत सर्वे माहिती नसल्याने सीमा दिशा निर्देश समजत नाही. याऐवजी प्रचलित शेत, इमारत मालकाचे नाव, चौकाचे, रस्त्यांचे नाव वापरलेले नाही. या ऐवजी प्रसिद्ध लँडमार्क वापरण्याचे नगरपरिषदेने टाळल्याने नागरिकांना सीमा कळू नये हा नगर परिषदेचा उद्देश स्पष्ट होतो. प्रभाग क्रमांक ७ व ८ या प्रभागांची सीमा रेषा स्पष्टच होत नाही. यातील प्रभाग क्रमांक ८ ची पश्चिम बाजूचे वर्णन करतांना ङ्गङ्गगुरांच्या गोठ्यापासून अशी सुरुवात केल्याने नगर परिषदेकडे चांगल्या लँडमार्कांची वानवा असल्याचे स्पष्ट होत आहे.

४.प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्ट्या आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता खालील बाबी विचारात घ्याव्यात.त्यासाठी प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश असताना विदर्भ हौसिंग सोसायटी ही एकच कॉलनी असताना तिचे जाणीवपूर्वक कुणाला



तरी फायदा व्हावा या उद्देशाने तिचे विभाजन करून दोन प्रभागात एकाच वस्तीचे विभाजन करण्यात आले आहे.

५.अनुसूचित जाती/जमातीच्या वस्तींचे अन्यायकारक विभाजन झाले आहे. शहरातील सर्वच अनुसूचित जाती आणि जमातीच्या वस्त्या दोन वेगवेगळ्या प्रभागात घेतल्याने अनुसूचित जाती व जमातीच्या नागरिकांची मते विखुरली जावी हा उद्देश स्पष्ट झाला आहे.

६. नागरिकांच्या दैनंदिन सोयीसुविधांचा व शासकीय/सामाजिक संस्थांचा योग्य विचार केलेला नाही.

७. प्रभागांमध्ये लोकसंख्या संतुलनाचे निकष पाळलेले नाहीत. वरील कारणास्तव सदर प्रभाग रचना ही शासनाच्या नियम व मार्गदर्शक तत्वांनुसार न झाल्यामुळे मी या विरोधात आक्षेप नोंदवित आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शंकासमाधान ही सरकारची जबाबदारी

## संपादकीय लेख

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही मानली जाते. आपल्या संविधानात एक प्रगतिशील आणि दूरदृष्टीपूर्ण दृष्टिकोन आहे. हा दृष्टिकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सिद्ध झाला. हा केवळ एक लिखित दस्तऐवज नाही, तर एक जिवंत आणि काळानुसार विकसित होणारा दस्तऐवज आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी अलीकडेच एडिनबर्ग विद्यापीठात भाषण करताना भारताच्या संविधानाचे वर्णन ङ्गजिवंत आणि बदलत्या काळाशी जुळवून घेणारे दस्तऐवजफ असे केले ते अतिशय सार्थ आहे. गेल्या ७५ वर्षांहून अधिक काळात, काळाच्या मागणीनुसार अनेक घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. न्यायपालिका संसदेला सर्वो च्च मान देत असली तरी संविधानाची मूलभूत रचना कायम ठेवण्याचा त्यांचाही कटाक्ष कायम राहिलेला आहे, हे येथे लक्षात घ्यायला हवे. अलीकडे संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या टप्प्यात, २० ऑगस्ट २०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत तीन अत्यंत महत्त्वपूर्ण विधेयके सादर केली आणि त्यामुळे संसदेतच नव्हे तर संसदेबाहेरही एका नव्या वादळाने जन्म घेतला. ही विधेयके अशी - संविधान (१३०वी दुरुस्ती) विधेयक, २०२५, केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक, २०२५ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक, २०२५. या विधेयकांद्वारे भारतीय संविधानातील अनुच्छेद ७५, १६४ आणि २३९एए यांमध्ये बदल सुचवण्यात आला आहे. यामध्ये प्रमुख बदल म्हणजे: -जर पंतप्रधान किंवा केंद्रातील मंत्री एखाद्या गंभीर गुन्ह्यात ३० दिवस सलग अटकेत असतील तर राष्ट्रपती त्यांना पदावरून काढू शकतात, किंवा ३१व्या दिवशी आपोआप त्यांचे पद संपुष्टात येईल. -राज्यातील मुख्यमंत्र्यांसाठी व मंत्र्यांसाठीही अशीच तरतूद केली जाईल मात्र येथे राज्यपाल निर्णय घेतील. -दिल्लीसाठी नायब राज्यपाल हे निर्णय घेतील. - केंद्रशासित प्रदेश व जम्मू-काश्मीरसाठी हाच नियम लागू होईल. हे विधेयक संविधानात बदल घडवून आणणारे असल्याने, लोकसभा आणि राज्यसभेत दोन तृतियांश बहुमताने ते मंजूर होणे आवश्यक आहे. मंजुरीनंतर ते राष्ट्रपतींकडे सादर केले जाईल. संविधान दुरुस्ती असल्याने राष्ट्रपतींना हे विधेयक परत पाठवण्याचा अधिकार नाही. त्यांनी सही केल्यानंतरच या विधेयकाचे रूपांतर कायद्यात होईल. त्यानंतरच कुणाला द्यायचे असल्यास याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येईल. आपल्या सर्वोच्च न्यायालयाने आत्तापर्यंत १२९ घटनादुरुस्त्यांपैकी सहा दुरुस्त्या अंशतः रद्द केल्या आहेत. एकमेव पूर्णपणे रद्द झालेली सुधारणा होती ९९ वी घटना दुरुस्ती (राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग एनजेएसी). ही दुरुस्ती संविधानाच्या मूलभूत रचनेचा भंग करते, असे तेव्हा न्यायालयाने सांगितले होते. या विधेयकाबाबत केंद्र सरकार म्हणते की, ही सुधारणा ङ्गघटनात्मक नैतिकतेफच्या आधारावर केली जात आहे. गंभीर आरोपांखाली तुरुंगात असलेल्या नेत्यांना हे विधेयक रोखेल. हे ङ्गचांगल्या प्रशासनाफचे लक्षण असून ङ्गतुरुंगातून सत्तेचा वापरफहोऊ नये यासाठी केले गेले आहे. सरकार असेही सांगते की, अटकेतून सुटल्यावर नेत्याला पुन्हा नेमण्यात येऊ शकते. परंतु, याला अनेक आक्षेप घेतले जात आहेत. मुळात नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार, जोपर्यंत दोष सिद्ध होत नाही, तोपर्यंत कोणीही दोषी मानले जात नाही. निवडणूक प्रतिनिधित्व कायदा सांगतो की, फक्त न्यायालयाचा दोषसिद्धीचा निर्णय झाल्यासच प्रतिनिधी पद गमावतो. आरोपपत्रे किंवा एफआयआर त्यासाठी पुरेशा नसतात. त्यामुळे एखाद्या व्यक्तीस केवळ अटकेच्या आधारे पदावरून हटवणे हे अन्यायकारक ठरू शकते. या प्रस्तावामुळे केंद्र सरकारला राज्यांतील विरोधी पक्षाची सरकारे अस्थिर करता येतील. केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून राजकीय हेतूने विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकणे आणि नंतर त्यांचे पद जाणे - ही एक धोकादायक शक्यता व्यक्त केली जाते. पुढे जाऊन, अशा कायद्याचा वापर करून आणखी अनेक नेत्यांवर पक्षांतरासाठी दबाव टाकला जाऊ शकतो. विशेषतः पीएमएलएसारख्या कडक कायद्यांतून ३० दिवसांत जामीन मिळवणे जवळपास अशक्य असते हे तर दिसतेच. कोणतेही विधेयक संसदेत सादर करण्याची एक स्थापित प्रक्रिया असते. या विधेयकावेळी ती पाळली गेली नाही, असा विरोधकांचा आरोप आहे. या विधेयकांची प्रत सदस्यांना विधेयक सादर करण्याच्या दिवसाच्या आधीच्या मध्यरात्रीनंतर, २-३ वाजता दिली गेली आणि नंतरच्या काही तासांतच ती सभागृहात मांडण्यात आली, असे काही सदस्यांनी आपल्या भाषणांत सांगितले. सामान्यतः वस्तुतः संसदीय परंपरेनुसार ज्यासाठी पूर्वसूचना देणे आणि विधेयक सादर करण्यापूर्वी सदस्यांमध्ये प्रसारित करणे आवश्यक आहे. एक गंभीर आक्षेप घेण्यात आला की गृहमंत्री शहा यांनी १९ ऑगस्ट रोजी लोकसभेच्या महासचिवांना पत्र लिहून पुढच्या दिवसाच्या (२० जुलै) कामकाजात ही विधेयके समाविष्ट करण्याची विनंती केली. अधिवेशन नंतर केवळ दोन दिवसांनी २१ ऑगस्ट रोजी संपणार होते. विरोधकांनी विधेयक मांडण्याच्या या प्रक्रियेवर आक्षेप घेतला आणि सभागृहात गोंधळ घालून विधेयकांच्या प्रती फाडल्या. निषेधाच्या या मार्गाबद्दलही निकोप लोकशाहीत चर्चा झाली पाहिजे. आता या घटना दुरुस्ती विधेयकाच्या छाननीसाठी जी संयुक्त संसदीय समिती-जेपीसी प्रस्तावित आहे त्यातही विरोधकांच्या समावेशाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही समिती लोकसभा आणि राज्यसभेतील ३१ सदस्यांची असेल आणि विविध पक्षांचे प्रतिनिधित्व त्यात असेल. समिती आपला अहवाल संसदेच्या हिवाळी अधिवेशनाअखेर सादर करणे अपेक्षित आहे. मात्र विरोधकांनी या जेपीसीमध्ये सहभागी होऊन विरोध नोंदवला तरच विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर त्यांचा सहभाग उपयुक्त ठरू शकतो. विधेयकांबद्दलची आणखी एक अस्वस्थता त्यांच्या मूळ मजकुरापेक्षाही भारतातील तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीच्या वास्तवातून उद्भवलेली आहे गेल्या दशकात, सक्तवसुली संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) आणि केंद्र सरकारला अहवाल देणाऱ्या इतर एजन्सींवर न्यायालये आणि विरोधी पक्षांनी पक्षपाती पद्धतीने काम केल्याचा आरोप केला आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी राजकीय लढाईफ्मध्ये भाग घेतल्याबद्दल तपाससंस्थांना यंदा जुलैमध्येच तीव्र शब्दांत समज दिली होती. अगदी ऑगस्टमध्ये न्यायालयाच्या दुसऱ्या खंडपीठाने तपास यंत्रणांना ङ्गतुम्ही सर्व मर्यादा ओलांडत आहातफ असे फटकारले होते.

## ईद मिलादुन्नबीनिमित्त १४३ रक्तदात्यांनी रक्तदान केले!

### अल मदिना एज्युकेशन फाउंडेशनचा एक स्तुत्य उपक्रम

**जनसंचलन/ बुलढाणा**

ईद मिलादुन्नबी म्हणजेच पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या १५०० व्या जयंतीनिमित्त, रविवार, ३१ ऑगस्ट रोजी इक्बाल चौक जामा मशिदीजवळ अल मदीना एज्युकेशन फाउंडेशनने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात १४३ रक्तदात्यांनी रक्तदान करून पैगंबर मोहम्मद साहेब यांना आदरांजली वाहिली. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही अल मदिना एज्युकेशन फाउंडेशनकडून हजरत मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक कल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे यावर्षी पैगंबर साहेब यांच्या १५०० व्या जयंतीचे विशेष महत्त्व असल्याने, ईद मिलादुन्नबी देशभर आणि जगात उत्साहात साजरी केली जात आहे. १५०० व्या जयंती स्मरणीय करण्यासाठी आणि समाजातील गरजू लोकांना मदत करण्यासाठी, अल मदिना फाउंडेशनकडून विविध सामाजिक कल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




दरम्यान, रविवार, ३१ ऑगस्ट रोजी स्थानिक इक्बाल चौक जामा मशिदीच्या मैदानात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत सुमारे १४३ रक्तदात्यांनी रक्तदान करून पैगंबर मोहम्मद साहेब यांना आदरांजली वाहिली. जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा आणि उपजिल्हा रुग्णालय खामगावच्या दोन पथकांनी रक्त संकलनात सहकार्य केले. यावेळी विविध सामाजिक, राजकीय आणि धार्मिक मान्यवरांनी रक्तदान शिबिराला भेट दिली तर अल मदिना एज्युकेशन फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी रक्तदान कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोठे प्रयत्न केले

## रेतीची अवैध वाहतूक करणारा टिप्पर पकडला!

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली खडकपूर्णा धरण व नदीपात्रातील रेतीचे अवैध उत्खनन रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असताना, काही तस्कर अजूनही सक्रिय आहेत. रेतीची अवैध वाहतूक करीत असल्याचे पुन्हा उघड झाले आहे. ३० ऑगस्ट रोजी मध्यरात्री पोलिस उपनिरीक्षक दत्ता नरवाडे व त्यांच्या पथकाने गस्तीदरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे शहराबाहेरील वळण रस्त्यावर ट्रॅप लावून (एमएच १४-एलबी १४१६) या क्रमांकाचा टिप्पर अडविला. तपासणीत त्यामध्ये ४ ब्रास रेती आढळून आली. सदर टिप्परची किंमत सुमारे १२



लाख असून, एकूण मुद्देमालाची किंमत १२.१६ लाख इतकी आहे. हे सर्व साहित्य देऊळगावराजा पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले आहे. याप्रकरणी, दत्ताराम मुरली धारे (रा. निमगाव गुरू) याच्याविरुद्ध गौण खनिज कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास पोलिस निरीक्षक ब्रह्मगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरीक्षक नारायण गिते करीत आहेत

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चंद्रकांत पाटील भलतंच बोलून गेले, मराठा आंदोलकांमध्ये संतापाची लाट....

**पंढरपूर:** मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात राज्यभरातील मराठा बांधव आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करत असताना महाविकास आघाडीसह सत्ताधारी महायुतीतील अनेक नेते आणि आमदार-खासदार या आंदोलनाचं समर्थन करत आहेत. मात्र भाजप नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आरक्षण प्रश्नावर आज पंढरपूर इथं भूमिका मांडताना केलेल्या वक्तव्याने नवा वाद निर्माण झाला आहे. ङ्कङ्कआझाद मैदानावर आंदोलनाला परवानगी दिलेली असताना सर्वसामान्य मुंबईकरांना वेठीस धरणे चुकीचं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करत आहेत. मी देवेंद्र फडणवीस यांची महाराजांसोबत तुलना करत नाही, अन्यथा नवीन



वाद तयार होईल,ङ्कङ्क असं वक्तव्य पाटील यांनी केलं आहे. एकीकडे भाजपचेच नेते आणि मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा समाजावर आंदोलनावरून कोणतेही दोषारोप करू नका, असं सांगत असताना चंद्रकांत पाटील यांनी मात्र आंदोलनातून मुंबईकरांना वेठीस धरणं चुकीचं असल्याचं म्हटल्याने संताप व्यक्त केला जात आहे. सध्या सुरू असलेले आंदोलन हे मुंबईकरांना वेठीस धरण्याचे काम आहे. राजकीय आरक्षण मिळवण्याची ही धडपड असून येणाऱ्या पंचायत राज निवडणुकीत ओबीसी आरक्षण घेऊन राजकीय वापर करायचा प्रयत्न सुरू आहे. मात्र जरी दाखला मिळाला तरी त्याची व्हॅलिडिटी झाल्याशिवाय हे होऊ शकत नाही. आरक्षण खरे मराठ्यांचे आरक्षण आहे. मराठे सामाजिक मागास नाहीत. मराठ्यांना दलितांसारखी अस्पृश्यतेची वागणूक मिळाली नाही. मात्र गावच्या सरपंचपदासाठी आणि राजकारणासाठी हे सर्व सुरू असून पूर्वी दिलेल्या एसईबीसी आरक्षणामध्ये राजकीय आरक्षण नसल्यानेच आता राजकीय आरक्षणासाठी ही धडपड सुरू आहे,ङ्कङ्क असा गंभीर आरोप चंद्रकांत पाटील यांनी केला आहे.मराठा आरक्षण प्रश्नावर आपली भूमिका मांडताना चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, ङ्कङ्ककायदेशीरदृष्ट्या ज्याचा दाखला नाही अशा मराठा समाजातील व्यक्तींना ओबीसीमधून आरक्षण मिळणं अशक्य आहे. आज वेळ मारून नेण्यासाठी जरी काही मागण्या तशाच मान्य केल्या तरी त्या कायदेशीरदृष्ट्या टिकणाऱ्या नसतील. सगेसोयरेबाबत अध्यादेशही निघालेला आहे आणि आपल्या पितृसत्ताक समाजाच्या नियमानुसार सगेसोयरे हे फक्त वडिलांकडचेच मानले जातात आणि अशा सगळ्या सोयऱ्यांना दाखले मिळण्यास सुरुवात झाली आहे. एकाला दाखला मिळतो, त्यावेळी त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबातील दहा जणांना याचा फायदा होतो, याचा विचार करता लाखो समाज बांधवांना आता कुणबी दाखल्याचा लाभ होत आहे,ङ्कङ्क असा दावा पाटील यांनी केला आहे.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्याचाही चंद्रकांत पाटील यांनी समाचार घेतला. एकनाथ शिंदे किंवा देवेंद्र फडणवीस हे कधीही खोटे बोलत नाहीत. मात्र काही लोक नेहमीच खोटं बोल पण रेटून बोल, असं करत असल्याचा टोला पाटील यांनी राज ठाकरेंना लगावला.

# आझाद मैदानावर तुफान गोंधळ, सुप्रिया सुळे यांची गाडी अडवली, घेराव घातला, आंदोलक आक्रमक

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आल्या. पण मनोज जरांगे यांची भेट घेऊन परतत असताना मराठा आंदोलक आक्रमक झाले. मराठा आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांना घेराव घातला. सुप्रिया सुळे कशातरी गाडीत बसल्या. पण त्यानंतर आंदोलकांनी प्रचंड गोंदळ घातला. आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांची गाडी अडवली. आंदोलकांनी काही वेळ गोंधळ घातला. सुदैवाने यावेळी काही मराठा आंदोलकांनी गाडी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. पण बरेच मराठा आंदोलक हे गाडी अडवण्यासाठी पळत जाताना दिसले. यावेळी काही आंदोलकांनी शरद पवारांनी आमचं वाटोळं केलं, असं म्हटलं. तर सुप्रिया सुळे यांची गाडी पुढे निघाल्यानंतर आंदोलकांनी त्यांच्या गाडीवर बॉटलही फेकून मारल्या.खासदार सुप्रिया सुळे यांनी आज आझाद मैदान येथे जात मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत त्यांचं बोलणं होऊ शकलं नाही. सुप्रिया सुळे या मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी मंचावर गेल्या. पण मनोज जरांगे हे झोपलेले होते. यामुळे त्यांनी इतर मराठा समन्वयकांसोबत चर्चा केली. तसेच मनोज जरांगे यांना झोपेतून जाग आल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी त्यांच्यासोबत बोलण्याचा प्रयत्न केला. सुप्रिया सुळे यांनी त्यांना प्रकृतीची काळजी घेण्याचं आवाहन केलं. यावेळी मनोज जरांगे यांनी मान हलवत होकार दिला. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावलेली बघायला मिळत आहे. त्यांच्यात त्राण दिसत नाहीय. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी यावेळी माध्यमांना



प्रतिक्रिया दिली.ङ्कङ्कमी डॉक्टरांशी चर्चा केली. मनोज जरांगे यांनी चार दिवसांपासून काही खाल्लेलं नाही. त्यांना प्रचंड अशक्तपणा आलेला आहे. डॉक्टरांचं तेच म्हणणं होतं, चार दिवसांपासून शरीरात अन्न न गेल्यामुळे त्यांना प्रचंड अशक्तपणा आलेला आहे. त्यांना थकल्यासारखं वाटत होतं. त्यामुळे ते आराम करत होते. मी त्यांना म्हणत होते की, त्यांना उठवूच नका. पण सरपंचांचा आग्रह होता त्यामुळे मी त्यांना म्हटले की, काळजी करु नका. तब्येतीची काळजी घ्या. सगळ्यांच्या जबाबदाऱ्या आहेत. त्यांचे घरचे सुद्धा काळजी करत असतीलङ्कङ्कआंदोलकांचं म्हणणं होतं की, मी मुंबई महापालिकेला विनंती करावी. मी कालही महापालिकेच्या आयुक्तांशी संपर्क केला. या भागात स्वच्छतेचा मोठा प्रश्न येतोय. महाराष्ट्रातून सगळ्याच लोकांनी अन्नाचा प्रश्न सोडवलेला आहे. सगळ्यांचं म्हणणं आहे, महापालिका प्रशासनाला सांगून इथे टॉयलेच्या स्वच्छतेबाबत, तसेच मैदानात चार लाईट्सची व्यवस्था व्हावी. स्वच्छतेची मागणीदेखील सर्वात महत्त्वाची आहे. इथे प्रचंड अस्वच्छता आहे. त्यामुळे मी प्रशासनाला विनंती करणार आहे, असी प्रतिक्रिया सुप्रिय सुळे यांनी दिली.

# अजित पवार सर्व कार्यक्रम रद्द करून मुंबईला, पडद्यामागच्या हालचाली वाढल्या

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत होणारे उरुळी कांचन ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे उद्घाटन अखेर फक्त शरद पवार यांच्या हस्तेच झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार तातडीने मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती मिळाली आहे. मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी आज मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे त्यांच्या जागी आमदार माऊली कटके कार्यक्रमाला उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने उरुळी ग्रामपंचायतीचे कामकाज साकारण्यात आले आहे, त्यामुळे त्यांनी उपस्थित राहावे अशी गावकऱ्यांची अपेक्षा होती. तसेच, नवीन महानगरपालिका उभारण्याच्या प्रक्रियेत उरुळी कांचनचा समावेश होणार आहे. गावासाठी अनेक प्रस्ताव अजित पवार यांनी केले आहेत. यापूर्वी उरुळी कांचनमधील शाळा, रस्ते आणि इतर विकासकामे शरद पवार यांच्या हस्तेच झालेली आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी या कार्यालयाचे उद्घाटन शरद पवार आणि अजित पवार यांच्या संयुक्त हस्ते व्हावे, अशी मागणी केली होती. परंतु गेल्या अनेक कार्यक्रमांत अजित पवार, शरद पवारांसोबत मंचावर येणं टाळत असल्याचे चित्र दिसून आले आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्येही शरद पवारांच्या शेजारी बसणं अजित पवार टाळत असल्याचे उदाहरण पाहायला मिळाले आहे. त्यामुळे दोघे एकत्र आल्यावर नेहमीच राजकीय चर्चांना उधाण येते.दरम्यान, मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर मागील तीन दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. मोठ्या संख्येने मराठा बांधव मुंबईत ठाण मांडून बसले आहेत.

# अलौकिक विभूतिमत्व आनंदनाथ महाराज

राजाधिराज श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या प्रभावळीत फार फार मौल्यवान रत्ने स्वामी कृपेनेच लाभलेल्या अपार तेजाने तळपताना दिसतात. या अनर्घ्य रत्नांपैकी, एक अलौकिक विभूतिमत्व म्हणजेच, सद्गुरू आनंदनाथ महाराज हे होत. आनंदनाथ महाराज हे तळकोकणातील वालावल गावचे, म्हणून त्यांचे नाव पडले वालावलकर. पुढे ते वेंगुर्ले कॅम्प परिसरात स्वामी महाराजांचे मंदिर बांधून राहू लागले. तिथेच त्यांनी १९०३ साली ज्येष्ठ शुद्ध षष्ठीला जिवंत समाधी घेतली.

स्वामी महाराजांची कीर्ती ऐकून आनंदनाथ महाराज अक्कलकोटी दर्शनासाठी निघाले. इकडे स्वामी माऊलीलाही आपले लाडके लेकरू कधी एकदा भेटते असे झाले होते. म्हणून स्वामीराज महाराज स्वतःच अक्कलकोटबाहेर येऊन एका झाडावर वाट पाहत बसले होते. आनंदनाथ महाराज नेमके तेथेच येऊन जरा विसावले. झाडावरून उडी टाकून स्वामीराजांनी त्यांच्यासमोर प्रकट होऊन त्यांना खूण दाखवली. आपली साक्षात् परब्रह्ममाउली समोर उभी राहिलेली पाहून आनंदनाथांनी गहिवरून त्यांचे चरण हृदयी कवटाळले. स्वामीरायांनीही आपल्या जन्मजन्मांतरीच्या या लाडक्या निजदासाच्या मस्तकी कृपाहस्त ठेवून पूर्ण कृपादान केले. तसेच तोंडातून कफाचा बेडका काढून त्यांच्या ओंजळीत टाकला. त्या बेडक्यात इवल्याशा चरण पादुका स्पष्ट दिसत होत्या. हेच स्वामीमहाराजांनी आनंदनाथांना प्रसाद म्हणून दिलेले आत्मलिंग होय. आजही ते दिव्य आत्मलिंग वेंगुर्ले येथे नित्यपूजेत असून दर गुरुवारी भक्तांना त्याचे दर्शन मिळते.

स्वामी माऊलीने स्वमुखातून काढून दिलेल्या आत्मलिंग पादुका वेंगुर्ले येथे आहेत. स्वामी महाराजांचे श्रेष्ठ शिष्य सद्गुरू आनंदनाथ महाराज ह्यांची पवित्र संजीवन समाधी येथे आहे. शिर्डीच्या साईनाथाना जगतासमोर आणण्याच्या कार्यात यांचा मोलाचा सहभाग होता. स्वामी गुरुस्तव स्तोत्र, स्वामी चरित्रस्तोत्र, आत्मबोधगीता, भजनानंद लहरी, स्वामी समर्थ स्तवनगाथा (२७०० दिव्य अभंगांसहित) अशा स्वामी कृपेने भरलेल्या



अद्भुत दिव्य रचनांची निर्मिती करून संजीवन समाधिस्थ झाले. सद्गुरू आनंदनाथांचे नातू गुरुनाथबुवा वालावलकर यांनी आनंदनाथ यांचे स्वामी समर्थ कार्य नेटाने पुढे चालवले.

स्त्रियस्य चरितम् पुरुषस्य भाग्यम्फ या दोन्हींविषयी परमेश्वरदेखील अनभिज्ञ असतो अशा अर्थाचे एक संस्कृत वचन खरे ठरावे आणि सिंधुदुर्ग जिह्यातील ङ्गवेंगुर्लेफ गावाला सिद्ध सत्पुरुषाचे सान्निध्य लाभावे या करिताच जणू नियतीने वालावलकर कुटुंबाची निवड केली असावी. या कुटुंबात जन्मलेला आणि ङ्गगुरुनाथ एकनाथ वालावलकरफ अशी नाममुद्रेची भरघोस खूण वागविणारा बालक चारचौघांसारखे लौकिक आयुष्य जगला, वाढला आणि गृहस्थाश्रमाचा स्वीकार करता झाला. ऐन उमेदीतल्या गुरुनाथ वालावलकरांनी चरितार्थासाठी हरड्याचा (औषधी गुणधर्मांचे फळ) विक्री व्यवसाय सुरू केला. मात्र सारे काही स्थिरस्थावर होत असल्याची जाणीव होईपर्यंत त्यांच्या चाकोरीबद्ध आयुष्याला एकाएकी नवे वळण लाभले आणि पुढे आयुष्याच्या अखेरीस गुरुनाथांची ओळख आध्यात्मिक जगताकरिता ङ्गश्री आनंदनाथ महाराजफ अशी झाली. हे कोणामुळे घडले, का घडले, कसे घडले या सर्व अगम्य आणि अतर्क्य प्रश्नांची उत्तरे केवळ अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थांकडे होती. अक्कलकोटस्थ स्वामी समर्थांचा प्रिय शिष्य म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या व पुढे प्रस्थापितही करणाऱ्या आनंदनाथांचा जन्म तत्कालीन सावंतवाडी परगण्याच्या बांदा गावामधील मडुरे-डिगेवाडी येथे राहणाऱ्या वालावलकर कुटुंबामध्ये झाला. त्यांचे मूळ नाव गुरुनाथ. बालपण आणि तारुण्य सरताना गुरुनाथ उद्योगधंद्याच्या निमित्ताने वेंगुर्ला कॅम्प व बाजारभागात हरड्याचा व्यापार करू लागले. यानिमित्ताने त्यांचे मुंबईस वरचेवर येणे-जाणेदेखील होत असे. मुंबईच्या प्रिन्सेस स्ट्रीट येथे बळवंतराव भेंडे ऊर्फ तात महाराज यांच्या व्यापारी पेढीवर गुरुनाथांचा मुक्काम होत असे. तात महाराजांच्या घरी, जांभूळवाडी येथेही त्यांचे येणे-जाणे असे. तात महाराज अनेकदा बाबूलनाथ येथे जात असत त्यावेळेस गुरुनाथही त्यांच्या सोबत जात असत.

तात महाराज प्रपंचात राहूनही परमार्थात उच्चतम अवस्था प्राप्त केलेले साधक होते. त्यांना श्री स्वामी समर्थांचा अनुग्रह लाभला होता. एकेवेळी अक्कलकोट येथे गेले असताना त्यांना श्री स्वामी समर्थांच्या जागी साक्षात शंकराचे दर्शन घडले होते. तात महाराज गुरुनाथांना श्री स्वामी समर्थांविषयी नित्य सांगत असत. त्यामुळे गुरुनाथांची स्वामींना भेटण्याची तळमळ, उत्कंठा दिवसेंदिवस वाढती झाली.

एके दिवशी स्वामी समर्थांच्या दिव्य अनुभूतीची भेट व्हावी या तळमळीतून गुरुनाथांनी तडक अक्कलकोटच्या दिशेने धाव घेतली आणि ते स्वामीचरणी दाखल झाले. स्वामिरायांच्या भेटीसाठी मन आसुसलेले होते. कधी एकदा स्वामिचरणी नतमस्तक होऊ अशी त्यांची अवस्था झाली होती. या विचारात असताना त्यांना त्यांच्यामागे अस्पष्टशी हालचाल जाणवली. ते मागे वळून पाहतात तो काय! भक्ताभिमानी, कल्पतरू स्वामी समर्थ साक्षात उभे ठाकले होते. अक्कलकोटमधील स्वामींच्या सहवासातील ते काही क्षण गुरुनाथांच्या उभ्या आयुष्याला ढवळून काढते झाले. स्वामींच्या दिव्य, सगुण रूपामध्ये विरघळून गेलेले गुरुनाथ घरी आले असले तरीही मनाने मात्र स्वामींच्या चरणांपाशी घोटाळत होते. केवळ एका दृष्टिक्षेपात स्वामींनी त्यांचे आयुष्य बदलले. गुरुनाथांनी पत्नीची मनधरणी केली, घडला प्रकार सांगितला. त्यांची अवस्था पाहून त्यांच्या पत्नीने त्यांना ङ्गपुन्हा अक्कलकोटास जाण्यासफ आडकाठी केली नाही.

व्यापारधंद्याची जोखीम तात महाराज आणि पत्नीच्या खांद्यावर टाकून गुरुनाथ अक्कलकोटास निघाले. स्वामिस्वरूप परमेश्वराच्या सान्निध्यात अष्टौप्रहर रमणाऱ्या गुरुनाथांची भावावस्था दिवसेंदिवस प्रखर होत गेली. महाराजांची सेवा करण्यात गुरुनाथांचा सर्व वेळ खर्च होऊ लागला, देहभान नाहीसे झाले. ज्याला मोक्षरूपी वस्त्र प्राप्त झाले, तो देह झाकणाऱ्या वीतभर कापडाची तमा ती काय बाळगणार? स्वामी महाराजांनी गुरुनाथांमधील आत्मतत्त्व जागृत केले. बऱ्याचदा स्वामी गुरुनाथांना बोलावून ङ्गआनंद करा, आनंदनाथ व्हा!फ असे सांगत असत. हे पाहून तेथील काही मंडळींनी गुरुनाथांचे नामकरण ङ्गआनंदनाथफ असे केले. स्वामिकृपा प्राप्त झाल्यावर आनंदनाथांमधील सुप्तावस्थेत असलेली काव्य प्रतिभा अधिक तीव्रतेने प्रकट झाली. स्वामी समर्थांचा कृपाप्रसाद आनंदनाथांसाठी सरस्वतीचा वरदहस्त ठरला. त्यांच्या काव्य प्रतिभेला स्वामींच्या दैवी साक्षात्काराचा स्पर्श झाला. आनंदनाथ महाराजांनी स्वामी महाराजांवर पाच हजारांहून अधिक अभंग, ङ्गअद्वैत बोधामृतसारफ व ङ्गअभेद कल्पतरूफ हे दोन ग्रंथ, त्याशिवाय श्रीगुरुस्तव, श्री स्वामिचरित्र, स्तोत्र तसेच आध्यात्मातील अनेक कूट विषयांवर विविध रचना केल्या आहेत. त्यातील काही साहित्य गुं. फ. आजगावकर यांनी ङ्गस्वामी समर्थ स्तवनगाथाफ या ग्रंथातून प्रसिद्ध केले. अशातच स्वामी समर्थांनी साक्षात सरस्वतीस्वरूप ङ्गआत्मलिंगफ प्रदान केल्यामुळे आनंदनाथांची प्रतिभासृष्टी अधिकच बहरास आली. काव्यरसामध्ये न्हाऊन गेलेली त्यांची सहजसुंदर पदे, अभंग यामुळे स्वामींच्या चरित्र रेखाटनास अधिक उठाव मिळाला. स्वामी समर्थांच्या प्रिय शिष्यांपैकी असलेल्या या महत्त्वाच्या शिष्योत्तमाने अल्पावधीतच स्वामी समर्थ संप्रदायामध्ये मानाचे स्थान प्राप्त केले. आनंदनाथांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेला स्वामिभक्तीचा प्रचार व प्रसार. स्वामिराज गुरू माझे आई, मजला ठाव द्यावा पायी। हा स्वामिभक्तांमध्ये विलक्षण लोकप्रिय असलेला नामगजर रचणारे आनंदनाथ महाराज यांचे आणखी एक महत्त्वपूर्ण आणि अलौकिक कार्य शिर्डीच्या साईबाबांना आध्यात्मिक जगतामध्ये प्रसिद्धीसफ आणण्याचे आहे.

# पायात पेटके आल्यास काय कराल?

या पेटयांची तीव्रता जास्त असेल तर होणाऱ्या वेदनेची तीव्रताही जास्त असते.तुम्ही झोपलेले असताना किंवा आराम करत असताना किंवा व्यायाम करत असताना पेटयांचे प्रमाण जास्त असते.शरीरातील द्रवाचं प्रमाण कमी किंवा कॅल्शिअमचं प्रमाण कमी झालं असताना खेळल्यास किंवा शारीरिक कष्ट केल्यास स्नायूंमध्ये पेटके येण्याची श्नयता असते. पेटके फक्त खेळाडूंनाच नाही, तर कष्ट कणाऱ्यांना, गर्भवती स्त्रियांना, ५० नंतर वय झालेल्यांनाही पेटके येत असतात. दिवसा किंवा रात्रीच्या वेळी पायांत पेटके येऊ शकतात. उन्हाळ्यामध्ये हवा उष्ण असल्यामुळे घाम येतो आणि त्यामुळे आपल्या शरीरातील द्रवाचं प्रमाण झपाट्याने कमी होत जातं. शरीरातील पोटॅशिअम आणि मॅग्निशिअम इलेट्रोलाईट्सच्या स्वरूपामध्ये घामावाटे शरीरातून बाहेर पडते. त्यामुळे शरीरामध्ये या घटकांची कमतरता निर्माण होऊन स्नायूंमध्ये पेटके येण्याचं प्रमाण वाढतं. व्यायाम करत असताना स्नायूंमध्ये पेटके आल्यास स्नायू ओढले गेल्याचं जाणवून वेदना होऊ लागतात.याला प्रतिबंध करण्याच्या उपाय म्हणून कॅल्शिअम, मॅग्निशिअम आणि पोटॅशिअम यांचा आहारात समावेश करावा आणि भरपूर प्रमाणात पाणी प्यावे.

पेटके आल्यास काय करावे?

करत असलेले काम थांबवा, आणि पेटके आलेला भाग ताणण्याचा प्रयत्न करा. त्या भागाला मालीश करा.

स्नायूंमध्ये सूज असल्यास जळजळ न करणारी औषधे वेदनेपासून आराम देण्यास मदत करू शकतात.

क्षमतेनुसार व्यायाम करा आणि व्यायामात बदल करत राहा.

भरपूर द्रव पदार्थाचे सेवन करा, पॉटॅशिअमचे प्रमाण वाढवा, संत्री व केळी यात पॉटॅशिअम असते.



पुरेशा प्रमाणात द्रव पदार्थांचं सेवन न करणे हे खेळताना पेटके येण्याचं कारण असतं.

# सापळ्यात अडकला अधिकारी

कल्याणी येथील सागर हॉटेलमध्ये सुमित आणि अमित हे सख्खे चुलत भाऊ ठरल्याप्रमाणे हॉटेलमध्ये हजर झालेले होते व पोलीस अधिकारी सुरेश यांची ते वाट बघत होते. काही वेळातच पोलीस अधिकारी सुरेश दोन अनोळखी व्यक्तींसह सागर हॉटेलमध्ये आले आणि सुमित आणि आम्ही बोलणी झाल्यानंतर याच्या पुढील तुमचं काम हे दोघेजण करतील, असं सुरेश याने सुमित आणि अमितला सांगितलं व ठरल्याप्रमाणे कामाची अर्धी रक्कम तुम्ही आणलीत का? अशी त्यांनी विचारणा केली. त्यावेळी दोघांनी ङहो आणली आहेफ असं सांगून ती देण्यासाठी त्यांनी चार लाख रुपये असलेली पैशाची बॅग सुरेशला देण्यासाठी पुढे केली. त्याचवेळी दबा धरून बसलेले लाचलुचपत प्रतिबंध कायद्याचे अधिकारी यांनी रंगेहाथ पोलीस अधिकारी सुरेश यांना पैशासकट पकडले.

अमित आणि सुमित हे सुशिक्षित बेरोजगार होते. कुठेही त्यांना नोकरी लागत नव्हती आणि त्यातच त्यांची ओळख भिवंडी येथील पोलीस अधिकारी सुरेश यांच्याशी झाली. सुरेश यांनी दोघांना ङमी तुम्हाला पोलीस सेवेमध्ये भरती करून घेतो, माझी ओळख मंत्रालयात सुद्धा आहे व गृह खात्यामध्येही आहेफ असं त्यांना सांगितलं व बोलणी करण्यासाठी आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी भिवंडी येथील हॉटेलमध्ये त्यांना बोलावलं होतं. सुरेशने दोघांची कागदपत्र बघितल्यानंतर शंभर टक्के मी तुम्हाला नोकरीला लावतो, असं त्यांना आश्वासन दिलं आणि त्यासाठी प्रत्येकी पाच पाच लाख



रुपये खर्च येईल, असं त्यांनी सांगितलं. दोघांनी विचार केला की, आपल्याला काही खटपट न करता कोणताही त्रास सहन करता जर सरकारी सेवेमध्ये नोकरी मिळत असेल, तर रिस्क घेण्यात कोणती अडचण नाही, तेही तयार झाले आणि घरी आल्यानंतर वडीलधाऱ्या माणसांना त्यांनी झालेल्या सर्व गोष्ट सांगितली. ङआम्हाला सरकारी नोकरी मिळत आहे, त्यासाठी पैसे भरावे लागणार आहेत. त्याकरिता आम्हा दोघांना पाच पाच लाख रुपये द्यावे, असं त्याने आपल्या घरच्या लोकांना विनंती केली. पण, घरातील ज्येष्ठ मंडळींना ही गोष्ट कुठे तरी खटकली. सुरेश फक्त जुजबी ओळखीचा माणूस होता. त्याच्यावर विश्वास कसा ठेवायचा? या मुलांना समजावून त्यांनी बघितलं, पण मुलं काही समजण्यास तयार नव्हती. उलट आपल्याच घरातील ज्येष्ठांवर ते भडकू लागले. ङआम्हाला नोकरी मिळते, तर तुम्ही आम्हाला मदत करत नाही. मग घरातील लोक शेजारीच असलेले समाजसेवक धीरज यांच्याकडे या मुलांना घेऊन गेले आणि त्यांनी सुरेशची चौकशी करतो, असं वचन दिलं.

धीरज यांनी अमित आणि सुमितच्या कुटुंबाला घेऊन लाच प्रतिबंधक कायद्याच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन झालेल्या प्रकाराबद्दल माहिती दिली आणि या अधिकाऱ्यांनी सुमित आणि अमितच्या घरात या लोकांना मदत करतो, असं सांगून एक सापळा रचला. त्या सापळ्याप्रमाणे दोघांनाही दोन दोन असे चार लाख रुपये देण्यात आले. त्या नोटांचे नंबरही नोंद करण्यात आले होते आणि पोलीस अधिकारी सुरेश याला त्यांनी फोन केला की, आमच्याकडे पैशांचा बंदोबस्त झालेला आहे. तर सुरेश यांनीच कल्याणच्या सागर हॉटेलमध्ये भेटायला त्यांना बोलावलं होतं. त्याचवेळी लाच घेताना पोलीस अधिकारी सुरेश याला लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडलं. लाच प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या सापळ्यात पोलीस अधिकारी सुरेश सहजरीत्या फसला गेला. रंगेहाथ पकडल्या गेल्यामुळे लाच प्रतिबंध कायद्याअंतर्गत त्याच्यावर कल्याण न्यायालयात खटला सुरू असून खटला प्रलंबित आहे.


आजकालची तरुण पिढी कोणतेही कष्ट, मेहनत घेत नाही. आपल्याला सहजासहजी सर्व गोष्टी उपलब्ध व्हाव्यात असा त्यांचा मनसुबा असतो. पैसे फेकले की काम झालं पाहिजे, अशी त्यांची मनोवृत्ती झालेली आहे आणि याच मनोवृत्तीचा फायदा समाजातील अशी विकृत माणसं उचलत आहेत. जास्त करून सुशिक्षित बेरोजगारांना हेरून सरकारी सेवेतील लोक पैशाच्या लालसेपोटी अशा तरुणांना फसवत आहेत. पण, आजकालच्या पिढीला ते लक्षात येत नाही आणि जेव्हा लक्षात येतं, तेव्हा आपण फसवले गेलेलो आहोत याची जाणीव होते. समाजसेवकांच्या हुशारीमुळे अमित आणि सुमित याचे कुटुंब मोठ्या संकटापासून खरोखर बचावले

# भार

पूर्वी दिवाळीच्या दिवशी सकाळी बरीच लोकं दारात फराळ, पोहे वगैरे मागायला येत. तेव्हा त्यांच्यासाठी डबाभर पोहे, थोडे फराळाचे पदार्थ मी बाहेरच काढून ठेवत असे. एका वेळी चार-पाचजण कदाचित एकाच घरातील किंवा एकाच वस्तीतली एकदम येत. बरोबर प्रत्येकाची एकेक पिशवी असायची. त्यात प्रत्येकाला मूठभर पोहे, एखादी चकली, करंजी असं एका कागदात गुंडाळून त्यांच्या पिशवीत टाकायचं. पण आता शिक्षणाच्या प्रसारामुळे शहाणी झालेली ही माणसं किंवा त्यांच्या पुढच्या पिढ्यांना आता घरोघरी जाऊन, असं काही मागायची लाज वाटत असावी. त्यामुळे जवळपास कोणी येत नाही. पण परवा लाखणकाकूफ आली सकाळी. लांबूनच तिची ङओ वैनीफ हाक ऐकू आली. बाहेर जाऊन पाहिलं, तर लाखणीन पायरीवर धापा टाकत बसली. तिची अवस्था बघून तिला पाणी हवं का? विचारलं. ती नको म्हणाली. मग आत जाऊन तिला फराळाचे काही पदार्थ पिशवीत बांधून दिले. पन्नास रुपये हातावर टेकवले. तेव्हा तिला भरून आलं. ङयाचीच मला गरज होती गो! खायला कोण नाय कोण देतं. पण हातात पैसा नाय. आता काम नाय गे करूक जमत! तुका देव काय पण कमी पडूक देवचा नायफअसा तोंडभर आशीर्वाद देऊन ती पुढच्या घरी गेली. तिच्या त्या थकलेल्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत राहिले. खूप महिन्यांपूर्वी एकदा वाटेत भेटली होती. डोक्यावर



कसलीतरी पिशवी होती. कशीबशी कमरेवर हात ठेवून हळूहळू चालत घरी चालली होती. तिला म्हटलं, अगो, या वयात आता कशाला ही ओझी नेतेस डोक्यावरून? काय करू ग्ये? नशीबाचे भोग भोगावे लागतंत.!फ मग सगळी कर्मकहाणी तिने थोडक्यात सांगितली. पाच-सहा वर्षांपूर्वी तिचा नवरा गेला. मोलमजुरी करायचा. थोडी दारू प्यायचा. पण बाकी गरीब होता स्वभावानं. तीही चार घरी कामाला जायची. पोरगा तरणाताठा. शिक्षणात काय डोकं नव्हतंच. आठवी-नववीपर्यंतच शिकला नि शाळा सोडली. तोही मग कुणाच्या तरी हाताखाली गवंडीकाम वगैरे करून चार पैसे कमवू लागला. तोपर्यंत ठीक होतं. पण त्याचं लग्न झालं. दहावी शिकलेली बायको मिळाली. म्हणजे त्यांच्या घरात ती हुशारच! पोरगा तिच्या कलेने वागू लागला. सासऱ्याला सुनेच्या हुशारीचं कौतुक होतं. पण सासूचं एकही काम हलकं होत नव्हतं. सुनेने काहीतरी कामाला हातभार लावावा ही तिची अपेक्षा काही चुकीची नव्हती. पण सून बोलण्यात एकदमच ताडफाड होती. ती कोणाचं काही ऐकून घेत नसे. शेवटी व्हायचं तेच झालं. सासू-सुनेचे खटके उडायला लागले. तेव्हा सासूने मुलाला वेगळं राहायला सांगितलं. रोजच्या कटकटीपेक्षा स्वतंत्र संसार थाटलेला बरा. तुम्ही सुखी, आम्ही सुखी! मुलानेही पडत्या फळाची आज्ञा मानून एकाच घरात वेगळा संसार थाटला.



# आरोग्यासाठी अंघोळीचे तंत्र कसे असले पाहिजे ?

अंघोळीच्या संबंधी आपल्या सवयी सतत बदलत असतात.हिवाळ्यात अनेकजण काही दिवस अंघोळ करत नाहीत, तर उन्हाळ्यात बरेचजण दिवसातून दोन-तीन वेळा अंघोळ करतात. परंतु आपल्याला अंघोळीचे महत्त्व समजून घ्यायला हवे आणि आपल्या जीवनशैलीशी संबंधित इतर गोष्टींप्रमाणेच तुम्ही अंघोळीसाठी काही नियमांचीही विशेष काळजी घेतली पाहिजे.अनेक तज्ञ सकाळपेक्षा संध्याकाळी अंघोळ करणे अधिक फायदेशीर मानतात. कारण अंघोळ करताना तुम्ही केवळ शरीराची स्वच्छता करत नाही, तर त्या वेळी तुमचे रक्ताभिसरणही सुधारते आणि अंघोळ केल्याने तुमची मानसिक उदासीनताही दूर होते.सकाळी नियमित वेळेवर जागे होऊन ताजेतवाणे व्हा, तुम्ही कितीही थकलेले असले तरीही चांगल्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरणारी दिनचर्या विकसित करा.झोपण्याची आणि दररोज त्याच वेळी जागे होण्याची वेळ निश्चित करा. तुमच्या शरीराला वेळेवर झोपायला शिकवणारी सर्वसमावेशक झोपण्याच्या वेळेची दिनचर्या विकसित करा. अशा प्रकारे जागे व्हा की तुमच्या शरीराला कळेल की खरोखर सकाळ झाली आहे.गरम पाण्याने आंघोळ केल्यानंतर शारीरिक थकवा दूर होतो. पण त्वचेचं भरपूर नुकसान होते. यामुळे गरम पाण्याऐवजी थंड पाण्याने आंघोळ करावी. थंड पाण्याने आंघोळ करणं त्रासदायक वाटत असल्यास कोमट पाण्याचा वापर करावा.

पण अति गरम पाण्याने आंघोळ करणं टाळावं. तुम्ही सुद्धा आंघोळीदरम्यान या पाच चुका करत असाल तर त्वचेचं नुकसान होऊ शकते. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.बहुतेक लोक आंघोळ करताना केसांवर वारंवार शॅम्पू वापरतात, परंतु जर तुमची टाळू तेलकट नसेल तर तुम्हाला दररोज केस धुण्याची गरज नाही.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सरकारचं दुर्लक्ष, मनोज जरांगे उद्यापासून पाणीही बंद करणार; पत्रकार परिषदेत दिली माहिती



**मुंबई :** मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. ओबीसी कोट्यातून सरसकट मराठा आरक्षण द्यावे, या मागणीवर ते ठाम आहेत. यासाठी मराठ्यांनी मुंबईच्या आझाद मैदानात एल्गार पुकारला आहे. आज मनोज जरांगे पाटील या लढ्याचं नेतृत्व करत आहेत आणि ते आता आणखी आक्रमक झाले आहेत. गुरुवारपासून उपोषणाला सुरुवात झाली आहे. तर उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. तर मागण्या पूर्ण न झाल्यास उपोषण आणखी कडक करणार असल्याचा इशारा आज त्यांनी दिला आहे. उद्यापासून पाणी देखील पाणीही घेणार नसल्याचे जरांगेंनी म्हटले आहे.उद्यापासून उपोषण आणखी कडक करणार. काल आणि आज मी पाणी प्यायलो पण उद्यापासून मी पाणी पण घेणार नाही. पाणी बंदच करणार. सरकार ऐकत नाही, त्यासाठी उपोषण आणखी कडक करणार आहे. यासोबतच मराठ्यांना आवाहन करताना ते म्हणाले, मराठा तरुणांनी मान खाली घालावी लागेल असं पाऊल उचलू नये. सर्वांनी शांत राहायचं आहे. यांनी कितीही अन्याय अत्याचार करू द्या. मी आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा अल्टिमेटमच जरांगेंनी सरकारला दिला आहेजरांगेंनी असेही म्हटले की, ङ्ककुणी रेनकोट, छत्र्या वाटत असतील तर एक रुपया देऊ नका. काही लोकांनी धंदा सुरू केला आहे. समाजाच्या नावाने कमवत आहेत. रेनकोट वाटपाच्या नावाखाली पैसे गोळे करू नका. हे मी शेवटचं सांगतोय. महाराष्ट्रातील मराठ्यांनी कुणालाही पैसे द्यायचे नाही. फक्त गरीबाची सेवा करा. काही लोक समाजाला मदत करायची सोडून पैसे छापायला बघत आहे.दरम्यान, शिंदे समितीच्या शिष्टमंडळाची मनोज जरांगेंसोबत बैठक झाली. समितीच्या प्रतिनिधींनी असेही सांगितले की जरांगेंच्या काही मागण्या अंशतः मान्य केल्या आहेत. पण जरांगेंचे मात्र त्यावर समाधान झालेले दिसत नाही. यासोबतच मंत्रिमंडळ उपसमितीची देखील बैठक पार पडली आहे. यातच आज संध्याकाळी ५ वाजता राज्याच्या महाधिवक्त्यांसोबत चर्चा होणार. विधी आणि न्याय खात्याचे सचिव आणि आमच्या खात्याचे सचिव अशा सगळ्यांची कायदेशीर गुंता सोडवण्यासाठी बैठक होणार असल्याचे उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत. यावर जरांगे म्हणाले, ङ्ककाल जर मुख्यमंत्र्यांच्या घरी बैठक झाली. तातडीने मार्ग काढा असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिलेत असं ऐकलं. मग ज्यांना आदेश दिले तर ते मार्ग का काढत नाही. उपसमितीला आदेश दिला. मग मार्ग का काढत नाही. हे लय भंगार आहेत. नुसत्या बैठका घेत आहेत. बस्स झाल्या आता बैठका.

# भाकरी, चपाती, लोणचं अन् चटणी! मराठा आंदोलकांसाठी सामाजिक एकतेची शिदोरी



**अहिल्यानगर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानात सुरू केलेल्या उपोषणाला राज्यभरातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. लाखो मराठा बांधव त्यांच्या समर्थनार्थ मुंबईत दाखल झाले आहेत. मात्र, मुंबईतील हॉटेल्स व अनेक दुकाने बंद असल्याने मराठा बांधवांवर अन्न-पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक घरातून एक शिदोरी, या कोपरगाव सकल मराठा समाजाच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला फक्त मराठा समाजच नव्हे तर मुस्लिम समाज, आंबेडकर समाज तसेच विविध जाती-धर्मातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत सामाजिक ऐक्याची हृदयस्पर्शी जाणीव घडवून दिली. कोपरगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे आज रविवारी मोठ्या प्रमाणात फरसाण, भाकरी-चपात्या, शेंगदाणा चटणी, पाणी बाटल्या व विविध खाद्यपदार्थ एकत्र करून गाडीभर साहित्य मुंबईकडे रवाना करण्यात आले. यावेळी कोपरगावात धार्मिक व सामाजिक एकतेचे अनोखे दर्शन घडलं असून, कोपरगावातून निघालेली ही शिदोरी म्हणजे आंदोलनाला फक्त अन्नाची नव्हे तर सामाजिक ऐक्याची ताकद देणारी शिदोरी आहे, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. गाडी रवाना होताना कोपरगाव शहरातील सामाजिक कार्यकर्ते विविध पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते ,विविध जाती धर्मातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, बारामतीमधून देखील हजारो भाकऱ्यांचे डबे पोहोचले आहेत. साधारणपणे ५ हजार पाण्याच्या बाटल्या आणि १० हजाराहून अधिक भाकऱ्या तीन तासात या ठिकाणी जमा झाल्या. त्यानंतरही हा मदतीचा ओघ सुरूच आहे. बारामतीतील ही मदत, जोपर्यंत मनोज जरांगे पाटील हे आंदोलन करत आहेत तोपर्यंत मुंबईला पाठवली जाणार असल्याचं मराठा बांधवांच्या वतीने सांगण्यात आले. काल संध्याकाळी सहा वाजल्यापासून शहरातील मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक महिला या ठिकाणी या सर्व भाकरीचे डबे बांधण्याची तयारी करत होत्या.मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने आज येथे सांगण्यात आले की, जोपर्यंत मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन मुंबईमध्ये सुरू आहे तोपर्यंत बारामतीतून मदत सुरू राहणार आहे. उद्या रविवार सुट्टीचा दिवस असला तरी या ठिकाणी मदत सुरू राहणार असल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने देण्यात आली. विशेष म्हणजे बारामतीच्या विविध भागातून अगदी २० ते ३० किलोमीटर परिसरातून या ठिकाणी मराठा क्रांती मोर्चाचे मराठा बांधव डबे घेऊन येत होते.

# धाडसी शेजारणीमुळे टळली मोठी घटना, अपहरणाच्या प्रयत्नातून बचावली पाच वर्षांची बालिका

**कोल्हापूर :** कोल्हापुरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. एका पाच वर्षीय बालिकेच्या अपहरणाचा प्रयत्न शेजारच्या महिलेच्या धाडसामुळे फसला आहे. पन्हाळा तालुक्यातील कोडोली येथील वैभवनगर वसाहतीत हा प्रकार घडला आहे. रूम भाड्याने घेण्याचे कारण सांगत एक अनोळखी महिला गल्लीबोळांतून फिरत होती. तिने एका घराच्या मागे एकटी खेळणाऱ्या एक ५ वर्षांच्या मुलीला पळवून नेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र शेजारीच राहणाऱ्या महिलेने सतर्कता बाळगून त्या मुलीला वाचवलं आहे. ही थरारक घटना रविवारी सायंकाळी घडली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

रविवारी सायंकाळी, पन्हाळ्यातील कोडोलीतील वैभवनगर भागात अनोळखी महिला रुम भाड्याने पाहिजे म्हणत फिरताना, अत्तार कुटुंबाची पाच वर्षांची मुलगी उमिरा ही घराच्या मागे एकटी खेळत होती. ती एकटीच असल्याचे त्या महिलेच्या लक्षात आले. त्यामुळे पळवून नेण्याचा विचार करत त्या महिलेने क्षणार्धात उमीराला उचलले आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र उमीराने घाबरून आरडाओरड केल्याने शेजारच्या कमल ढेरे यांनी तात्काळ धाव घेतली. त्यांनी धाडसाने पाठलाग करून चिमुकलीची सुटका करत आरोपी महिलेला पळवून लावले.या घटनेनंतर आरोपी महिलेने जवळच उभ्या असणाऱ्या चारचाकी गाडीतून पलायन केले. दरम्यान, परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी करत पोलिसांना संबंधित घटनेची माहिती दिली. पोलिसांनी तपास सुरू केला असून, अपहरणकर्त्या महिलेचा कसोशीने शोध घेतला जात आहे.

या घटनेनंतर कोडोली परिसरासह तालुक्यातील पालकांमध्ये भीती आणि चिंता आहे. एकट्याने मुलांना खेळायला सोडायचे की नाही, याबाबत मोठं प्रश्नचिन्ह नागरिकांसमोर उभे राहीले आहे. तर मुलांच्या सुरक्षिततेबद्दल अधिक खबरदारी घेण्याचे आवाहन नागरिकांनी एकमेकांनाच केले आहे. दरम्यान, कमल ढेरे यांच्या सतर्कतेमुळे आणि धाडसामुळे एक मोठी दुर्घटना टळली आहे. शेजारधर्म निभावत त्यांनी दिलेले साहाय्य परिसरात कौतुकाचा विषय ठरले आहे.

# तुपकरांच्या नेतृत्वात मलकापुरात शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा ; पिकविमा, कर्जमुक्तीच्या प्रश्नावर- रविकांत तुपकर आक्रमक क्रांतिकारी आंदोलनाचा वणवा पेटवणार..

जनसंचलन/मलकापूर

शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आणि विविध मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली आज, शनिवारी मलकापूर येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले होते. थकलेला पिक विमा १००% मिळावा, शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळावी, विवरा गावातील सोलर कंपनीने अतिक्रमण केलेला रस्ता मोकळा व्हावा, ज्वारीची खरेदी सुरू व्हावी, तसेच कापूस आणि सोयाबीनच्या आयात-निर्यात धोरणात बदल व्हावा,शेतमजूरांना विमा सुरक्षा मिळावी, जंगली जनावरांचा त्रास अशा विविध मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चाला संबोधित करताना शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरकार आणि प्रशासनावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, ङ्कशेतकऱ्यांची ही लढाई दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई आहे. सरकारने कापसावरील आयात शुल्क हटवल्याने कापसाचे भाव कमी होण्याची भीती आहे. त्यामुळे सरकारने तातडीने आयात-निर्यात धोरणात बदल करावा. तसेच, सोयाबीनची सोयापेंड निर्यात करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना सोयाबीनला रास्त भाव मिळण्यास मदत होईल.फ्ऋ तुपकर यांनी पुढे सांगितले की, आज मलकापूरात सुरू झालेला हा मोर्चा एका वणव्यासारखा संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल. निवडणुकीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे दिलेले आश्वासन पूर्ण करावे. पिक विमा कंपन्यांनी अधिक विलंब न करता शेतकऱ्यांना थकित पिक विमा त्वरित द्यावा. सध्या आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहोत, परंतु सरकारने दिरंगाई केली तर आम्हाला आक्रमक आंदोलनही करता येईल,फ्ऋ असा इशारा त्यांनी दिला.

पिक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना थकित रक्कम तातडीने द्यावी. सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करावे. - ✻सोलर कंपनीचे अतिक्रमण हटवावे✻: विवरा गावातील सोलर कंपनीने अतिक्रमण केलेला रस्ता मोकळा करावा. -ज्वारी खरेदी सुरू व्हावी✻: शेतकऱ्यांची ज्वारी ची खरेदी त्वरित सुरू करावी आयात-निर्यात धोरणात बदल कापसावरील आयात शुल्क पुन्हा लागू करावे आणि सोयाबीन डीओसी, सोयापेंड निर्यातीला परवानगी द्यावी. या मोर्चात मलकापूर तालुक्यासह आसपासच्या परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी जनता चौक ते तहसील कार्यालय पायी मोर्चा करत आपला रोष व्यक्त केला. शांततेत काढण्यात



आलेल्या या मोर्चाने प्रशासनाला शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. मोठा पोलीस बंदोबस्त अन प्रशासनाला इशारारविकांत तुपकर यांनी प्रशासनाला उद्देशून सांगितले की, शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत. आम्ही शांततेच्या मार्गाने लढत आहोत, पण गरज पडल्यास आम्ही आंदोलन तीव्र करू.फ्ऋ मोर्चाच्या आयोजनाची जबाबदारी अमोल राऊत आणि सचिन शिंगोटे यांनी पारपाडली यावेळी सचिन पांडुळे,दामोदर शर्मा,गजानन भोपळे,विश्वास पाटील प्रविण पाटील,रंजीत डोसे, हर्षल मोरे, गोपाल रायपुरे, भागवत अढाव, विलास इंगळे,सुरज कोलते, गजानन नाईकवाडे,यांची प्रामुख्याने उपस्थिती होती हा मोर्चा शेतकऱ्यांच्या एकजुटीचे आणि त्यांच्या हक्कांसाठीच्या लढ्याचे प्रतीक ठरला असून, येत्या काळात या आंदोलनाचा वणवा राज्यभर पसरण्याची शक्यता तुपकर यांनी व्यक्त केली आहे.

# वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांनी आधार, स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

जनसंचलन/ बुलढाणा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासकीय वसतीगृहापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे. अर्जाची प्रक्रिया व निवड याद्या http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण जिल्हा कार्यालय, बुलढाणा येथे सादर करावा. इयत्ता १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले विद्यार्थी, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्याचे प्रमाणपत्र, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व धनगर समाजातील विद्यार्थी पात्र, किमान ६० टक्के (दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुण), पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजारांपेक्षा जास्त नसावे, कमाल वय ३० वर्षांपर्यंतच पात्र, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा तसेच कोणत्याही नोकरी/व्यवसायात नसावा.




# वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाची सामाजिक संवेदनशीलता....

## सफाई कामगार आणि विधवांच्या हस्ते गणपतीची आरती...

जनसंचलन/बुलडाणा

गणेशोत्सव केवळ धार्मिक स्वरूपात साजरा न करता त्याला सामाजिकता प्रदान करण्याच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. याअंतर्गत गुरुवार, २८ ऑगस्ट रोजी आरतीचा सन्मान सफाई कामगार आणि एकल-विधवा महिलांना देण्यात आला. ज्या हातात नेहमी खराटा-झाडू असतो, त्या हातात आरतीचे ताट होते. कुठल्याही धार्मिक कार्यक्रमांपासून विधवा-एकल महिलांना वंचित ठेवले जाते, परंतु वृत्तेश्वर मंडळाने विधवांना आरतीचा सन्मान देवून भेदभावाला हद्दपार करण्याचा सामाजिक संदेश दिला. वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाने दरदिवशी सामाजिक नावलौकिक असणाऱ्यांना आरतीचा सन्मान देण्याचे निश्चीत केले आहे. पहिली मानाची आरती पत्रकार मंडळींच्या हस्ते झाली. तर संध्याकाळच्या वेळी कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी किरण पाटील आरतीचे मानकरी होते. त्यांच्यासमवेत प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सुश्री उर्मीलादीदी आणि त्यांचे अनुयायी तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांची उपस्थिती होती. दुसऱ्या दिवशी सकाळी सफाई कर्मचाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. बुलढाणा शहराचे सफाईचे कंत्राट अकोला येथील कुमोदिनी संस्थेकडे नव्याने देण्यात आले आहे. मागील दोन महिन्यांपासून सदर संस्थेकडून शहरात युद्धस्तरावर सफाईची मोहिम राबविली जात आहे. त्यांच्याप्रति कृतज्ञता म्हणून रस्त्यावर काम करणाऱ्या महिला आणि पुरुष सफाई कर्मचाऱ्यांना आरतीचा बहुमान देण्यात आला. सफाई व्यवस्थापक पंकज काळेसह अनेक सफाई कर्मचाऱ्यांनी गणपतीची आरती केली. याप्रसंगी साधनाश्री कंस्ट्रक्शनचे गणेश जाधव सपत्नीक उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. संध्याकाळी विधवा-परितक्त्या एकल महिलांसाठी काम करणाऱ्या मानस फाऊंडेशनला आरतीसाठी आंमत्रित करण्यात आले होते. अध्यक्ष डी.एस. लहाने यांच्यासह श्रीमती शाहिनाताई पठाण, प्रज्ञाताई लांजेवार यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य आरतीसाठी प्रामुख्याने उपस्थित राहिले. विधवा तथा एकल महिलांना मिळालेला हा बहुमान अनिष्ट धार्मिक रूढी संपविण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल असल्याचे गौरवोद्गार यावेळी श्री लहाने यांनी काढले. सफाई कामगार आणि विधवा एकल महिलांच्या हस्ते



आरतीची संकल्पना यशस्वी करण्यासाठी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्यासह पत्रकार सर्वश्री चंद्रकांत बर्दे, राजेश डिडोळकर, नितीन शिरसाट, युवराज वाघ, रविंद्र गणेशे, गणेश निकम, शिवाजी मामनकर, कृष्णा सपकाळ, सुभाष लहाने, भानुदास लकडे, विजय देशमुख, ब्रह्मानंद जाधव, सुनिल तिजारे, विनोद सावळे, प्रशांत खंडारे, राम हिंगे, राजेंद्र टिकार, दीपक मोरे, अजय काकडे, संदीप वंनोळे, अभिषेक वरपे, डॉ. भागवत वसे, शौकत शाह, रहमत अली, रमेश उगले, तुषार यंगड, विलास खंडेराव, निनाजी भगत, रविकिरण टाकळकर, सुनिल मोरे, अजय राजगुरे, अक्षय थिगळे आदिंनी परिश्रम घेतले.

# आरटीओ कार्यालयातील महिला अधिकाऱ्याने एजंटच्या लगावली कानशिलात

## परस्परविरोधी तक्रारीवरून महिला अधिकाऱ्यासह एजंटवरही गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ बुलढाणा**

काही आठवड्यांपूर्वी बुलढाणा आरटीओ कार्यालयातील महिला अधिकाऱ्याने एका एजंटला शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमावर चांगलाच व्हायरल झाला होता.. तर पुन्हा एकदा या अधिकारी महिलेचा प्रताप समोर आला आहे त्याच एजंटला कानशिलात लगावत शिवीगाळ करतानाचा व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे यामुळे आरटीओ कार्यालय पुन्हा एकदा चर्चेत आल आहे... याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांनी आरटीओ एजंट च्या तक्रारीवरून महिला अधिकारी राजश्री चौधरी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, तर राजश्री चौधरी यांनी सुद्धा पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरटीओ एजंट इम्रान खान याच्यावर गुन्हा दाखल केला आहे, आरटीओ कार्यालयात विविध कामांसाठी जिल्हाभरातून येणाऱ्या नागरिकांना व आरटीओ एजंटला सदर महिला परिवहन अधिकारी उद्‌धटपणाची वागणूक देत शिवीगाळ करत असल्याच्या अनेक तक्रारी वरिष्ठांकडे करण्यात आल्या आहेत.. मात्र या महिला अधिकाऱ्यावर



कुठलीही कारवाई होताना दिसत नाही.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या दिल्ली येथील कार्यालयात केली गणरायाची आरती...



**जनसंचलन/बुलढाणा**

दिल्ली येथील २३ अशोका रोडस्थित कार्यालयात कर्मचाऱ्यांनी बसवलेल्या गणरायाची केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव मनोभावे पूजा चर्चा करून आरती केली दिल्ली येथील २३ अशोका रोड येथे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे निवासस्थान व संपर्क कार्यालय आहे या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी गणरायाची स्थापना गणेश चतुर्थीला केली काल केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी कार्यालयातील गणरायाची आरती केली गणेश भक्ताच्या जीवनातील दुःख नाहीये होऊन देशातील जनता सुखी समृद्ध आणि निरोगी आयुष्य मिळू दे बळीराजाला चांगले दिवस येऊ दे असे साकडे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी गणरायाच्या चरणी घातले. गणरायाची विधिवत पूजाअर्चा केली यावेळी त्यांच्यासोबत आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच मराठी इलेक्ट्रॉनिक मिडियाचे दिल्ली येथील प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते

# मराठा आरक्षण आंदोलनाला रहेमतिया सोशल ग्रुपचा हातभार...

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे सध्या मुंबईतील आझाद मैदान येथे आरक्षणाच्या मागणीसाठी ठामपणे आंदोलन सुरू ठेवून आहेत. परंतु, या ठिकाणी आंदोलनकर्त्यांवर अन्यायकारक पद्धतीने अडचणी निर्माण केल्या जात आहेत. शासनाने तेथील हॉटेल्स व जेवणाची व्यवस्था बंद करून आंदोलनकर्त्यांना अडचणीत आणले. अशा परिस्थितीत आपला मराठा बांधव उपाशी राहू नयेफ्र या भावनेतून डोणगाव येथील काही मराठा बांधवांनी मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत रहेमतिया सोशल ग्रुप तर्फे मदतीचा हात पुढे करण्यात आला. संस्थेच्या वतीने फुल नाही पण फ ुलाची पाकळी या भावनेतून ३० किलो गव्हाचे पीठ देण्यात आले



आंदोलनातील आयोजक मंडळींनी हा उपक्रम मोठ्या मनाने स्वीकारला व डोणगाव गावकऱ्यांचे तसेच रहेमतिया सोशल ग्रुपचे आभार मानले. या उपक्रमामागे रहेमतिया सोशल ग्रुपचे अध्यक्ष जैनुल आबेदीन शेख यांचे मार्गदर्शन लाभले तर आवेश खान पठाण, उस्मान कुरेशी, मोहम्मद शोएब आदी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. गावातील नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले असून धर्म-जात न पाहता संकटाच्या वेळी समाजासाठी एकत्र उभे राहू




# चला हवा येऊ द्या कार्यक्रमात हास्याचा धबधब्याने चिंब न्हाले रसिक प्रेक्षक।

## बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सवात मनोरंजनाची मेजवानी..

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळातर्फे सहकार विद्या मंदिरच्या भव्य सांस्कृतिक सभागृहात शुक्रवारी आयोजित चला हवा येऊ द्या कार्यक्रम रसिक प्रेक्षकांच्या प्रचंड उपस्थितीने हाऊसफुल्ल झाला.

झी टिव्ही वर गाजलेल्या या चला हवा येऊ द्या कार्यक्रमातील सर्वच कलावंतांनी प्रेक्षकांना खळाळून हसवले. विनोदाचा बादशहा भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, गौरव मोरे, अंकुर वाढवे, शिवकांता सुतार यांच्या अचूक टायमिंगच्या संवादफेकीला उत्कृष्ट संगीत संचाची साथ यामुळे हा कार्यक्रम अधिकच खुलत गेला, फ ुलत गेला. प्रसिद्ध नृत्यांगना विभूती सावंतने वीजेच्या चपळाईने केलेल्या दिलखेचक अदाकारीने प्रेक्षकांना आकर्षित केले. प्रसिद्ध झी मराठी फेम ढोलकी वादक कृष्णा मुसळे यांच्या चपखल, जादूई व कडाडत्या ढोलकी वादनामुळे प्रेक्षकांनी ठेका धरला. यावेळी अनेकांचे पाय थिरकले. गायक राजकुमार निंबोकार व रसिका जोशी यांच्या सुश्राव्य गायनाने रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. वेळोवेळी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात प्रेक्षकांनी दाद देऊन कलावंतांचा हुरुप वाढवला. अडीच तासांच्या कार्यक्रमात प्रेक्षकांनी मनोरंजनाचा मनमुराद आनंद घेतला. कृष्णा मुसळे, सतीश रुद्राकार, जयकुमार गुरु, विशाल पांडे, अभिजीत भावे, विशाल इंगळे यांच्या वाद्यवृंदाने कार्यक्रम बहारदार केला. श्रध्दा वरणकार हिने चला हवा येऊ द्या चे उत्कृष्ट सुत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतमाता पूजन केल्यानंतर बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमलताई झंवर यांनी सर्व कलावंतांचे स्वागत केले. यावेळी सहकार विद्या मंदिरच्या विद्यार्थीनीं भरतनृत्यमद्वारे गणेश वंदना सादर केली. अनंतभाऊ देशपांडे यांनीही



दिल तो है दिल... हे लतादीदींच्या आवाजातील गीत सुरेल सुरात सादर केले. बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेशामजी चांडक उपाख्य भाईजी यांच्या प्रेरणेतून आयोजिलेल्या या कार्यक्रमात आमदार संजय गायकवाड, रवीकांत तुपकर, संचालक गोपाल चिरानिया, कु कनिष्का झंवर, ॲड जितेंद्र कोठारी, राजेश देशलहरा, प्रामुख्याने उपस्थित होते. तर या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळ व सहकार विद्या मंदिर च्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.